# विपश्यना

साधक मराठी

E-NEWS LETTER
वार्षिक शुल्क रु. १००/

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

बुद्धवर्ष 2566, ज्येष्ठ पौर्णिमा (ऑनलाइन), 14 जून, 2022, वर्ष 6, अंक 3

For Online Patrika in various Languages, visit : https://www.vridhamma.org/newsletters


## धम्मवाणी

**सेखो पथविं विचेस्सति, यमलोकञ्च इमं सदेवकं।**
**सेखो धम्मपदं सुदेसितं, कुसलो पुप्फमिव पचेस्सति॥**

–धम्मपदपालि 45, पुप्फवग्गो..

शैक्ष्य (निर्वाणाच्या शोधात लागलेला व्यक्ती) च पृथ्वीवर, आणि देवतांसहित या यमलोकावर, विजय मिळवेल. शैक्ष्य (च) भल्या प्रकारे उपदिष्ट धर्माच्या पदांची फुलांप्रमाणे निवड करेल.


# धम्मगिरी: स्मरणीय दहा वर्षे

International Vipassana Newsletter, Vol. 13, No. 4 (December 1986 मधून साभार)



**१९७४**

अशी होती धम्मगिरी जेव्हा जुन्या घरांसहित खरेदी केली गेली. (पश्चिम दिशेकडून हवाई दृश्य)



**१९७४**

प्रारंभिक साधक, विद्यापीठाचे निर्माण-कार्य आरंभ होण्यापूर्वी जुन्या बंगल्या बाहेर खुल्या जागेत साधना करताना.

**१९७६**

प्रारंभिक भोजनालय, स्वयंपाक-घर आणि धम्म-कक्षाच्या पुढे काही सामुहिक शयन-कक्षही दिसत आहेत.



**१९७६**

अकादमीच्या प्रारंभिक ध्यान-कक्षात साधना-शिबीर, जे भोजनालयाच्या बाजूला होते.





**१९७८**

पगोड्याचा पाया खोदल्यावर पूज्य गुरुजी तसेच माताजींनी ध्यान करून भूमीला मैत्रीच्या तरंगांनी पूरित केले. (सोबत काही साधक ध्यान करताना.)




**१९७९**

भारतातील पहिल्या पगोड्याच्या उद्घाटनप्रसंगी पूज्य गुरुजींचे सार्वजनिक प्रवचन, ज्यामध्ये गावातील लोकही आमंत्रित होते.


**१९७९**

उद्घाटनाच्या रात्री सोनेरी रंगांनी आणि छत्रांनी सुसज्जित पगोडा लखलखीत प्रकाशाने झगमगत आहे.



**१९८३**

पगोडालगतच बनलेल्या नव-निर्मित साधना-कक्षाच्या बाहेर पूज्य गुरुजी तसेच माताजी फिरताना व मैत्री देतांना.



*हा शरद ऋतू धम्मगिरीच्या पहिल्या औपचारिक शिबिराच्या दहाव्या वर्धापनदिनाला अधोरेखित करतो. ऑक्टोबर १९७६ मध्ये विपश्यना विश्व विद्यापीठाने सर्व सामान्य जनतेच्या लाभार्थ पहिल्या दस दिवसीय शिबिराच्या रुपात धर्माचे द्वार उघडले. धम्मगिरीचे उद्घाटन-शिबिर भारतातील धर्म प्रसाराचे एक महत्वपूर्ण पाऊल होते. गोयंकाजींनी १९६९ पासूनच भारतात अस्थायी सुविधांचा उपयोग करत जसे तीर्थयात्रिंची विश्राम गृहे (धर्मशाळा), मंदिरे, मस्जिद, चर्च, मठ, शाळा, हॉटेल्स इत्यादी; इथपर्यंत की व्यक्तिगत निवास स्थानांमध्येही शिबिरे संचालित करणे सुरु केले होते. हे "जिप्सी कॅम्प" धर्माच्या बीजाला व्यापक रुपात पसरविण्यासाठी बहुमूल्य होते, परंतु विपश्यना साधनेच्या अभ्यासासाठी एक विशेष ठिकाण असणे खूप आवश्यक होते. सत्तरच्या प्रारंभिक दशकात जेव्हा श्री गोयंकाजींच्या काही शिष्यांनी बर्मामध्ये सयाजी ऊ बा खिन यांची भेट घेतली, तेव्हा सयाजींनी भारतात विपश्यना केंद्र स्थापन करण्याच्या महत्वावर जोर दिला होता.*

रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/286/2021-2023

*खरेतर यामध्ये आर्थिक अडचणींच्या व्यतिरिक्त काही इतरही दुर्जेय बाधा होत्या. एकीकडे जिथे भारतात बुद्धांना खूप सन्मान दिला जातो, तिथे "बौद्ध धर्मा"ला अधिकतर संशयाच्या दृष्टीने पाहिले जाते. अशा परिस्थितीत जर बुद्धांच्या शिक्षणाच्या प्रसारासाठी कोणत्या केंद्राची स्थापना केली गेली, तर याला एका सांप्रदायिक संस्थेच्या रुपात पाहिले जाण्याची जास्त शक्यता होती आणि तेव्हा याचे आकर्षण केवळ भारतातील अल्पसंख्यांक बौद्ध लोकांपर्यंतच सीमित झाले असते. या धोक्याला ओळखून श्री गोयंकाजींनी आपल्या प्रवचनांमध्ये विपश्यना साधना विधीला एक गैर-सांप्रदायिक आणि व्यावहारिक विद्या सांगितले जी सार्वजनिक प्राकृतिक नियमां (धर्मा) वर आधारित आहे. त्यांनी स्पष्ट केले की धम्मगिरी कोणती सांप्रदायिक संस्था किंवा अशा कोणत्या समुहाची संपत्ती नाही, तर त्या सर्वांच्या लाभासाठी आहे जे आपल्या मानसिक विकारांच्या आणि सर्व प्रकारच्या दु:खांपासून सुटका मिळवू इच्छित आहेत.*

*अजून एक समस्या ही होती की भारतातील लोक दानाच्या शुद्धतेपासून अनभिज्ञ होते. जिप्सी शिबिरांमध्ये साधकांना त्यांच्या राहण्या-खाण्याची व्यवस्था करावी लागते, यासाठी त्याचा खर्च द्यायलाच पाहिजे. परिस्थितींना पाहता, अशी व्यवस्था करणे चुकीचेही नव्हते. पण गोयंकाजींना वाटले की असे केल्याने विपश्यना केवळ धनी लोकांपुरतीच मर्यादित राहील. कोणत्याही विपश्यना केंद्रावर तर या आधारे काम होऊच शकत नाही. त्यांनी सयाजींच्या नीतीचे स्मरण केले, ज्यामध्ये सयाजींनी लिहिले होते, "माझ्या शिष्यांकडून कोणतेही प्रवेश शुल्क किंवा सदस्यता शुल्क अथवा ठराविक दानराशी आकारली जाऊ नये... आपणाला केवळ विपश्यना साधनेने लाभान्वित झालेल्या साधकांच्या शुद्ध दान-चेतनेने दिले गेलेल्या दानाचाच स्वीकार केला पाहिजे...जर कोणी आपल्या सारखेच अन्य लोकांनाही धर्म-साधनेचा लाभ घेण्यासाठी मदत करू इच्छित असेल आणि जर त्याला समजले असेल की जसा या विद्येने मला लाभ झाला तसेच इतर लोकही यापासून लाभान्वित व्हावेत, आणि जास्तीत जास्त लोकांना दीर्घकाळापर्यंत याचा वास्तविक लाभ मिळत राहावा तर त्याला धर्माच्या प्रचारासाठी, योग्य सुविधांचे दान देण्यापासून आपण रोखू शकत नाही, अर्थात त्याचे दान स्वीकारले पाहिजे."*

*अशा प्रकारे एका विपश्यना केंद्राची स्थापना, केवळ योग्य भूमी निवडणे आणि तिच्या खरेदीसाठी पैशांचे भुगतान करणे इतकेच नाही तर त्याच्यासाठी उचित आधारही आवश्यक आहे जसा की विपश्यना साधनेच्या लाभाचा लोक स्वत: अनुभव करतील आणि अन्य लोकही असा अनुभव करू शकतील अशी भावना जागृत होणे. कोणत्याही केंद्राच्या सफलतेसाठी याचे समर्थन करणाऱ्या तसेच तिथे येणाऱ्या सर्व लोकांना हे समजले पाहिजे.*

*श्री गोयंकाजींना पूर्ण विश्वास होता की धर्म या अडचणींना स्वत: दूर करेल. त्यांनी त्यांच्या आचार्यांच्या निर्देशांच्या आधारावर केंद्र स्थापित करण्याचे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी अथक परिश्रम केले, ज्यामुळे धर्म केवळ भारतातच नाही तर साऱ्या विश्वात पसरू शकेल.*


*जस-जशी ही महान परियोजना विकसित झाली, कित्येक विपश्यी साधक यात सामील होत गेले आणि काळ जाता-जाता हजारो साधक ध्यान करण्यासाठी आणि केंद्राच्या स्थापनेत आपला सहयोग देण्यासाठी धम्मगिरी आणि तिच्या नीतींशी जुळत गेले. गोयंकाजींच्या त्या सहयोगी साधकांची आपल्या शब्दांत धम्मगिरीच्या प्रारंभिक वर्षांची कहाणी अशा प्रकारे आहे–*

## धम्मगिरीचा आविर्भाव

डिसेंबर १९७३ मध्ये मी इगतपुरीपासून ४५ किमी. दूर देवळाली (नाशिक) मध्ये लागलेल्या विपश्यना शिबिरात पहिल्यांदा भाग घेतला. हे शिबिर मला थोडे कठीण पण खूप फायदेशीर वाटले. शिबिराच्या शेवटच्या दिवशी मला संयोगाने माहित झाले की श्री गोयंकाजी मुंबई क्षेत्रात ध्यान केंद्रासाठी एका जागेच्या शोधात आहेत. त्वरीत माझ्या मनात विचार आला की इगतपुरीपेक्षा अधिक उपयुक्त स्थान इतर कोणते होऊच शकत नाही. मी ज्या नगरात (इगतपुरीत) राहतो, तिथे पावसाळ्यात जसे पहाडांवरून झरे वाहू लागतात, तसेच इथून धर्माचे अपार झरे प्रवाहित होण्याची शक्यता आहे. मी श्री गोयंकाजींकडे गेलो आणि शिबिर समापनानंतर, मुंबईला परत जाताना आपल्या घरी चहासाठी आमंत्रित केले. मी त्यांना आश्वासन दिले की यामध्ये पाच मिनिटांहून अधिक वेळ लागणार नाही, कारण माझे घर देवळालीहून मुंबईला जाणाऱ्या मुख्य मार्गावरच आहे. माझी योजना ही होती की जेव्हा ते माझ्या घरी येतील, तेव्हा त्यांच्याशी केंद्रासाठी काही एक जागा दाखविण्याबाबत चर्चा करेन.

श्री गोयंकाजींचे उत्तर आधी उत्साहजनक नव्हते. त्यांनी विचारले, "जर मी रस्त्यात प्रत्येक घरी असा थांबत गेलो तर आपल्या घरी कसा पोहोचेन?" पण जेव्हा मी आग्रहपूर्वक अनुरोध केला की मी पाच मिनिटांहून अधिक वेळ लावणार नाही, तेव्हा त्यांनी करुणापूर्वक माझे निमंत्रण स्वीकारले. तरीही मला ताकीद दिली, "लक्षात ठेवा की पाच मिनिटे कुठे पाच तासात बदलणार तर नाहीत ना!"

आता माझ्या योजनेने काम केले. या विचाराने मन आनंदाने भरून गेले, पण ही भीतीही वाटत होती की हे विफलही होऊ शकते. श्री गोयंकाजी पुढे निघून जाऊ नयेत, या चिंतेने मी त्वरीत आपल्या घरी जाण्यासाठी निघू इच्छित होतो. ते कारने प्रवास करणार होते, जेव्हाकी मला बस किंवा ट्रेनने प्रवास करायचा होता जो त्यांच्या तुलनेने स्वाभाविकपणे खूप कमी गतीचा होता. दुपारच्या जेवणाची वेळ होती. मी भोजन कक्षात एक सह-साधक श्री रंगीलभाई मेहता यांचा निरोप घेण्यासाठी गेलो, ज्यांनी मला शिबिराला येते वेळी लिफ्ट दिली होती. माझ्या योजनेविषयी ऐकून त्यांनी आपली सहायता प्रकट केली. ते म्हणाले "चला जेवण करूया, नंतर आपण माझ्या कारने एकत्र जाऊ आणि काही वेळातच इगतपुरीला पोहोचू."



अशी होती धम्मगिरीची जमीन, जेव्हा जुन्या घरांसहित खरेदी केली गेली. (पश्चिम दिशेकडून हवाई दृश्य) - ज्यामध्ये जुनी घरे दिसत आहेत.

सगळे काही तसेच घडले जशी मला आशा होती. श्री गोयंकाजींच्या स्वागतासाठी आता आमच्याकडे बराच वेळ होता. जेव्हा आम्ही माझ्या घरात चहा पित होतो, मी विनंती केली की जर ते आत्ता वेळ काढू शकत असतील तर मी त्यांना या शहराच्या आसपास ध्यान केंद्रासाठी काही संभावित ठिकाणे दाखवू शकेन. त्यांनी सहमती दर्शवली आणि आम्ही मेहताजींसोबत त्या ठिकाणांना पाहण्यासाठी निघालो.

मी श्री गोयंकाजींना जी पहिली एक दोन ठिकाणे दाखवली, ती त्यांना स्पष्ट रूपाने आवडली नाहीत. मी त्यांना उपयुक्त स्थानासाठी दिशा-निर्देश मागितला. ते मला म्हणाले, "मला एक अशी जागा हवी आहे जी शहराच्या मध्ये नसावी, पण इतकी दूरही नसावी, जिथे पाणी, वीज आणि टेलिफोनसाठी सहजतेने कनेक्शनची व्यवस्था केली जाऊ शकेल आणि जिथे पोहोचणे खूप मुश्कील नसावे." मी त्वरीत त्यांना ते स्थान दाखवण्याचा विचार केला जिथे आता धम्मगिरी आहे. त्या वेळी तिथपर्यंत जाण्यासाठी कोणता पक्का रस्ता नव्हता, पण मेहताजींनी त्या ओबड-धोबड दगडांच्या तुकड्यांनी भरलेल्या कच्च्या रस्त्यावर आपली गाडी घालण्याची जोखीम पत्करताना जरादेखील संकोच केला नाही. जिथ पर्यंत गाडी जाऊ शकत होती तिथपर्यंत आम्ही गेलो, आणि मग गाडीतून बाहेर आलो. श्री गोयंकाजींनी आपल्या चारही बाजूंना लक्षपूर्वक पाहिले आणि काही मिनिटांमध्येच त्यांनी निश्चय केला की ही तीच जागा आहे जिचा शोध ते घेत होते. त्या वेळी कोणीतरी ज्या टेकडीवर आम्ही उभे होतो तिच्या पायथ्याशी एका प्रेताचा दाहसंस्कार होत असलेला दाखवला. मला चिंता वाटली की स्मशान घाटाची निकटता कुठे गोयंकाजींचा स्थानाविषयीचा विचार बदलवू नये. पण ते हसत हसत म्हणाले, "चांगले आहे! हे स्थान साधकांच्या मनात अनित्य (नश्वरता) च्या प्रति जागृततेला सतत बनवून ठेवेल."

तिथेच, त्याच वेळी मेहताजींनी जमीन खरीदण्याची आणि ट्रस्टला दान करण्याची इच्छा प्रदर्शित केली. आमच्या जाण्यापूर्वी आम्ही सर्व विवरणांची नोंद घेतली जेणेकरून व्यवहार लवकरात लवकर पूर्ण होऊ शकेल.

या सर्व गोष्टीत जवळपास पाच तास निघूनच गेले—एक कप चहासाठी खूप जास्त वेळ! श्री गोयंकाजींचा हा संदेह खरा झाला की माझ्या घरी थांबल्याने पाच मिनिटांहून अधिक वेळ लागेल, परंतु तो सार्थकी लागला.

तो दिवस—१६ डिसेंबर, १९७३—माझ्या जीवनातील सर्वात आनंदाचा दिवस होता. तेव्हापासून मी निष्ठापूर्वक विपश्यनेचा अभ्यास केला आहे आणि जो रिकामा वेळ मिळाला तो धर्मसेवेसाठी दिला आहे ज्यामुळे कित्येक लोक मुक्तीच्या सुखाचा अनुभव घेऊ शकतील.

– भोजराज संचेती, इगतपुरी, भारत

- *श्री गोयंकाजींनी नव्या केंद्राचे नाव "धम्मगिरी" ठेवले, ज्याचा अर्थ आहे – धर्माचा पर्वत .*
- *खूप लवकरच हे केंद्र साधकांना आकर्षित करू लागले.*

....................

## नवीन केंद्राचे प्रारंभिक साधक

मी १९७४ च्या सुरुवातीला पहिल्यांदा धम्मगिरीला आलो. मुंबईच्या जवळ एका शिबिरानंतर, मी श्री गोयंकाजींकडे नवीन खरेदी केलेल्या ठिकाणी जाण्याची अनुमती मागितली. त्यांनी मला स्वीकृती देताना इगतपुरीमधील श्री भोजराज यांच्याशी संपर्क करायला सांगितले. मी एका मित्रासोबत तिथे गेलो, आणि श्री भोजराज आम्हाला त्या पहाडीवर घेऊन गेले. त्या वेळी त्या जागेवर तीन चार जुनी घरे आणि आजूबाजूची ओसाड जमीन सामिल होती. जवळच्या छोट्या घरात तेव्हाही एक शेतकरी कुटुंब राहत होते. श्री भोजराज यांनी आमच्यासाठी सर्वात जुने घर उघडले, जिथे शेतकरी

आधी बकऱ्या वगैरे ठेवत होते. घरातील फरशी शेणाने/ मातीने आच्छादली होती आणि भिंती अनेक वर्षे स्वयंपाक केल्याने धुरामुळे काळ्या झाल्या होत्या.



प्रारंभिक साधक, विद्यापीठाचे निर्माणकार्य सुरू होण्यापुर्वी जुन्या बंगल्याच्या बाहेर खुल्या जागेत ध्यान करताना

मी तिथे साफसफाई करून जवळपास एक आठवडाभर राहिलो आणि परत गेलो. काही आठवड्यांनी जेव्हा मी परत आलो, तेव्हा ग्राहम गैम्बी आले होते. आम्ही दोघांनी मिळून अजून थोडी साफसफाई केली आणि तिथे ध्यान करणे सुरु केले. आम्ही श्री गोयंकाजींना पत्र लिहिले आणि त्यांना विचारले की जागेमध्ये सुधारणा करण्यासाठी आम्हाला काय काम केले पाहिजे- सफाई, झाडे-रोपे लावणे, इत्यादी. त्यांनी उत्तरामध्ये लिहिले, "प्रिय ग्राहम आणि डॉ. ज्यो, सुखी रहा! ध्यान करा, ध्यान करा, ध्यान करा! आपल्या स्वत:ला निर्मल करा आणि ध्यान केंद्राच्या तरंगांना निर्मल करा. अजून काहीच करू नका, बस ध्यान करा!" आणि आम्ही तेच केले.

सर्वात आधी पायाभूत साफसफाई करणे गरजेचे होते जेणेकरून जागेचा उपयोग आम्हाला करता येईल. आम्ही खालच्या विहिरीतून पाण्याच्या बादल्या भरून वर आणल्या आणि गुडघ्यांवर बसून आपल्या हातांनी रगडून रगडून दोन्ही खोल्यांची फरशी साफ केली.

आणि नंतर आम्ही दिवसातून सहा ते आठ तास ध्यान करणे सुरु केले. जरी शेजारी राहणाऱ्या शेतकरी कुटुंबातील गोंगाटाने ते खूप कठीण होते. पण काही दिवसांनी ते शेतकरी कुटुंब तिथून निघून गेले.

त्यानंतर एक मूक-बधिर मजूर सोनू याला तिथे कामावर ठेवले. जिथे आम्ही राहत होतो, त्याने त्या घराच्या भिंतीनाही सफेद रंगाने रंगवणे सुरु केले. रंगाच्या जवळजवळ आठ थरांनंतर भिंती काळ्या रंगापासून गडद तपकिरी, मग फिक्कट तपकिरी आणि त्यानंतर सफेद रंगाच्या झाल्या. आम्ही एका खोलीत ध्यान करत असू आणि दुसऱ्या खोलीत सोनू रंगाचे काम करीत असे.

एक दिवस, जेव्हा कदाचित ध्यान करता-करता मन थोडे कंटाळले, तेव्हा मी सोनूला इशारा केला की मी त्याच्या रंगाच्या कामात त्याला मदत करेन. इशाऱ्यानेच त्याने मला दृढतापूर्वक म्हटले, "तुम्ही ध्यान करा, मी रंगाचे काम करेन!" जेव्हा पाऊस आला तेव्हा आम्ही आमच्या फोमच्या आसनांना दगडाच्या फरशीपासून थोडे वर, २" उंच लाकडाचे पाट बनवून त्यावर ठेवले, कारण जास्त आर्द्रतेमुळे आसने पूर्णपणे भिजून जात होती. एकदा जेव्हा मी त्यावर बसून ध्यान करत होतो, तेव्हा मला पायाच्या अंगठ्यामध्ये खूप तीव्र वेदना होऊ लागली. मी विचार केला की हा एक वेगळा संस्कार असेल, म्हणून मी बस द्रष्टा भावाने ध्यान चालू ठेवले. थोड्या वेळाने पुन्हा तीव्र वेदना होऊ लागल्या, पुन्हा तिसऱ्यांदाही तेच झाले. तेव्हा मी खाली पाहिले तर एक छोटा उंदीर माझ्या पायाच्या अंगठ्याला चावत होता आणि प्रत्येक वेळी चावल्यावर लाकडाच्या पट्टीखाली लपत होता. याशिवाय मी मुंग्यांपासून वाचण्यासाठी स्वत:ला असे गुरफटून घेत होतो की मुंग्यांना माझ्या मानेपर्यंत किंवा पापण्यांपर्यंत किंवा माझ्या चेहऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी किमान ४५ मिनिटे लागतील.

श्री गोयंकाजी वेळो-वेळी, केंद्राच्या निर्माण योजनेचे आणि त्याच्या प्रगतीचे निरीक्षण करण्यासाठी येत असत. मला आठवते जेव्हा त्यांनी ठरवले की पगोडा कुठे होईल, त्या वेळी शांती पठार [जिथे आज पगोडा उभा आहे] कोणत्याही झाडांशिवाय फक्त एक मोकळे मैदान होते. पण तिथे आम्ही एक सामुहिक साधनेची बैठक केली—श्री गोयंकाजी, ग्राहम, नारायण दासरवार आणि मी. जेव्हा शांती पठारावर चार बोधि वृक्ष लावले गेले तेव्हा मी तिथे होतो. ग्राहम सारनाथ, बोधगया, श्रावस्ती आणि बर्मातील बोधिवृक्षाची रोपे घेऊन आले होते.

भवन निर्माणाचे काम १९७५ मध्ये सुरु झाले. जवळपास ८० लोकांची सुविधा लक्षात घेऊन निर्माण कार्य करण्यासाठी ट्रस्टने एका ठेकेदाराला नेमले होते. त्या वेळी श्री गोयंकाजींनी धम्मगिरी मध्ये राहणाऱ्या पश्चिम देशांमधील साधकांना पारंपारिक भारतीय ग्रामीण शैलीमधील गवताच्या झोपड्या बनविण्याची अनुमती दिली. निर्माण कार्य सुरु होताच मजुरांचे, त्यांच्या परिवारांचे आणि जनावरांचे त्या ठिकाणी तात्पुरत्या राहण्याचे स्थान बनले होते.

– सहायक आचार्य, डॉ. ज्यो पोलैंड, कैनडा

----------

सुरुवातीला जेव्हा कोणतेही निर्माणकार्य झाले नव्हते, तिथे उपस्थित असणारा प्रत्येक व्यक्ती दिवसातून सहा ते आठ तास ध्यान करीत होता. तेव्हा आम्हाला स्वत:ला सक्रिय आणि सजीव ठेवण्यासाठी खूप काम करावे लागत होते; वीज, पाणी किंवा नळाची कोणतीही सुविधा नव्हती. बस फक्त राहण्यासाठी एक रिकामे घर होते. धम्मगिरी मध्ये तेव्हा आश्रमासारखे वातावरण किंवा सुविधा नव्हत्या. हे वाळवंटात एका झोपडीमध्ये राहण्यासारखे होते. आम्ही अशा एका सुनसान पहाडीवर राहत होतो, जिथे आस-पास चार-सहा आंब्याची झाडे होती आणि चहू बाजूंनी हवेचे तीव्र झोत चालू राहायचे तसेच जोरदार पाऊस पडत राहायचा. तिथे साप, गिधाडे आणि कित्येक प्रकारचे किडे-मकोडे होते. किडे

वगैरे वास्तविकपणे जागेचे मालक होते आणि आम्ही लोक तिथे घुसखोर होतो. भारतीयांसोबत काम करणे खूप चांगले वाटले. सोनू सुरुवातीपासून तिथे होता. त्याचे एक प्रभावी व्यक्तित्व होते. बहिरा आणि मुका असल्यामुळे, त्याचे संवाद नेहमी सांकेतिक भाषेत व्हायचे. त्याच्याजवळ प्रत्येक विदेशीला कोणत्या ना कोणत्या शारीरिक विशेषतेनुसार ओळखण्याची एक विशेष पद्धत होती. ज्यो पोलैंड एक डॉक्टर होते, म्हणून त्यांचा बिना केसांचे, सुई टोचणारे अशा रुपात संकेत करायचा. ग्राहम, गोल चष्मा वापरत होते, म्हणून त्यांचा डोळ्यांसमोर दोन्ही हातांनी गोल दुर्बीणीसारखे करून संकेत करायचा. एक दिवस सोनू छतावर काही टाईल्स बदलत होता आणि दुसरा कोणी मजूर तिथे येवून शिडी घेवून गेला. तो बोलू शकत नव्हता, म्हणून त्याने खूप इशारे करून सांगण्याचा प्रयत्न करूनही छतावरच राहिला. अशा वेळी तो आपल्याजवळ न येता लांबूनच आपले ध्यान आकर्षित करायचे असल्यास आपल्याकडे छोटे खडे किंवा छोटे मातीचे गोळे फेकायचा, ज्यामुळे आपल्याला कळायचे की सोनू आपल्याला बोलवित आहे.

*[सोनू आजही धम्मगिरी मध्ये मुख्य मजदुरांमधून एक म्हणून काम करीत आहे, आणि श्री गोयंकाजींकडून ध्यानाच्या प्रारंभिक मार्ग दर्शनाने लाभान्वित झाला आहे. –संपादक]*

आम्ही रोज इतके व्यस्त राहात होतो की मला नाही वाटत की आम्ही कधी बसून हा विचार करीत असू की दहा वर्षांनंतर ही जागा कशी होईल? उलट आम्ही हा विचार करायचो की उद्या आम्हाला काय करायचे आहे? श्री गोयंकाजी आम्हाला प्रगतीच्या बातमीने, आणि हे कसे येणाऱ्या पिढ्यांसाठी एक महत्वपूर्ण केंद्र होईल, इत्यादी गोष्टींनी प्रोत्साहित करीत असायचे. पण पुन्हा दिवस-प्रतिदिवसाची कार्ये समोर येत आणि आम्ही त्यात जुटून जात असू. जेव्हा आम्ही झाडे-रोपे लावली तेव्हा जाणत होतो की एक दिवस हे ठिकाण एका अद्भुत सुंदर वनाचे रूप घेईल. पण वनाचा विचार करताना याकडेही लक्ष द्यावे लागत होते की आता आपल्याला या रोपांना पाणी द्यायचे आहे आणि काट-छाट करून त्यांची चांगली देखभाल करायची आहे इत्यादी...

– ल्युक मैथ्यूज, कैनडा

-------------

*नवीन केंद्रात मे १९७५ मध्ये, जुन्या साधकांसाठी एक शिबीर आयोजित केले गेले. हा लेख अमेरिकन 'विपस्सना न्यूजलेटर' जुलै-ऑगस्ट १९७५ मधून घेतला आहे–*

## केंद्रातील पहिले शिबिर

केंद्रातील भूमीच्या कणा-कणात धर्माची तरंगे प्रवाहित करण्यासाठी विपश्यना विश्व विद्यापीठात चार दिवसांच्या पहिल्या ऐतिहासिक शिबिरामध्ये एकूण ७६ साधकांनी भाग घेतला. खूप कमी कालावधीत केंद्राची मोठ्या प्रमाणात डागडुजी करण्यात आली आणि सर्व आवश्यक सुविधांची जसे- वीज, अस्थायी धम्महॉल, डायनिंग टेंट आणि स्नानघर इत्यादींची व्यवस्था केली गेली.

स्वाभाविक रूपाने कित्येक प्रारंभिक अडचणी होत्या त्या लवकरच दूर केल्या गेल्या. एका पाण्याच्या पाईपलाईनसाठी खोदकाम सुरु केले पण ते असफल झाले. त्यामुळे टैंकरने पाणी मागवावे लागले. भीषण उन्हाळ्यामध्ये शिबिर खूप कठीण गेले परंतु अनुभव देणारे सिध्द झाले. श्री गोयंकाजींनी जवळजवळ सर्व वेळ साधकांबरोबर धम्महॉलमध्ये ध्यान केले.

ज्या रात्री पहिले सामुहिक मैत्री सत्र आयोजित केले गेले, श्री गोयंकाजींनी केंद्राच्या भूमीवर राहणाऱ्या सर्व प्राण्यांना विशेष मैत्री दिली. त्यांनी घोषणा केली की धर्माच्या वातावरणात, आत्तापासून कोणत्याही प्राण्याला आपल्या जीवनासाठी भयभीत होण्याची आवश्यकता नाही. कोणी त्यांना मारणार नाही आणि ना ही त्यांना मारण्यासाठी कोणी आदेश देईल इत्यादी...



पगोड्याचा पाया भरताना पुज्य गुरुजी तसेच माताजींनी भूमीला मैत्री तरंगांनी पूरित करुन कॉन्क्रीट टाकले. (काही साधक/ट्रस्टी त्यांची मदत करताना.)

शिबिरादरम्यान श्री गोयंकाजींनी भूमीच्या सर्व भागांमध्ये फिरून सावधानतापूर्वक पडताळणी केली आणि निर्माण कार्याच्या योजनेनुसार भावी इमारतींच्या स्थळांचे निरीक्षण केले की कोठे स्वयंपाकघर, भोजनालय तसेच धम्म-कक्ष असावा आणि कोठे निवासी कक्ष तसेच शौचालय इत्यादी असावेत...

धर्म एक अमूल्य उपहार आहे, हे स्पष्ट करण्यासाठी श्री गोयंकाजींनी केंद्रामध्ये भोजन आणि निवासाचा खर्च भागवण्यासाठी एका नव्या व्यवस्थेचीही घोषणा केली. भविष्यात साधक आपल्या भोजन आणि अन्य खर्चांसाठी पैसे देऊ करणार नाहीत, तर आपल्या क्षमतेनुसार केंद्रामध्ये येणाऱ्या भावी साधकांप्रति मंगल भावनेने स्वैच्छिक दान देऊ शकतील. अशा प्रकारे ते धर्माने प्राप्त झालेली आपली सुख-शांती दुसऱ्यांबरोबर वाटू शकतील आणि सर्वांच्या लाभासाठी धर्मचक्र प्रवर्तन होत राहील. या पावलाचा उद्देश धर्म संस्थेला कोणत्याही प्रकारच्या व्यावसायीकरणापासून दूर ठेवणे हा आहे.

-------------

# पहिल्या वर्षातील धम्मगिरी

मी धम्मगिरीच्या औपचारिक उद्घाटनाच्या काही दिवसांनंतर, ऑक्टोबर १९७६ मध्ये तिथे पोहोचलो. पहिले दहा दिवसीय शिबिर चालू होते आणि मला पुढचे शिबिर सुरु होईपर्यंत मदत करण्यासाठी सांगितले गेले. माझे पहिले काम नव्या बाथरूमच्या टाईल्सवर लागलेला कचरा साफ करून त्या सफेद करणे आणि शांती पठाराच्या चारही बाजूच्या रस्त्या (चंक्रमण भूमी) ला साफ करणे हे होते. मी ही जागा पाहून दंग झालो. मी असा विचार केला होता की मी अशा एका नव्या केंद्रात जात आहे जे पूर्णपणे तयार असेल. परंतु, हे मला एक कच्चे, अधुरे निर्माण स्थळ वाटू लागले. काही इमारती अर्धवट होत्या आणि त्या सर्व विटांनी घेरलेल्या होत्या. आत्तापर्यंत काही थोडीच रोपे-झाडे लावली गेली होती.

तरीही, केंद्रामध्ये एक प्रकारची दिव्य सुंदरता होती. रोज संध्याकाळी जेव्हा श्री गोयंकाजी भोजनालया शेजारील ध्यान कक्षामध्ये हिंदीमध्ये प्रवचन देत असत, तेव्हा मी बाहेर बसून आसपासच्या पहाडांची शोभा न्याहाळत राहायचो. धम्मगिरीचे हे प्रारंभिक शिबिर होते, आणि नगरातील बरेच जण प्रवचन ऐकण्यासाठी येऊ इच्छित होते. हॉलमध्ये त्यांच्यासाठी जागा नव्हती. त्याकरीता बाहेर लाउडस्पीकर लावले गेले होते आणि दरवाजांसमोर आम्रवृक्षाखाली जाजम अंथरले होते. रोज संध्याकाळी पन्नास ते शंभर लोक येत आणि तिथे बसत. ते सर्व वयोगटाचे पारंपारिक भारतीय पोशाखातील साधारण लोक होते. ते श्री गोयंकाजींचे शब्द लक्ष देऊन ऐकत असत, जणू त्यांच्या पूर्वजांनी बुद्धांची प्रवचने ऐकली असावीत. प्रवचन संपल्यावर आपल्या झोपलेल्या मुलांना घेऊन, अंधारात पटापट आपल्या घरी निघून जात.

मी नोव्हेंबर पासून शिबिरात बसणे सुरु केले, आणि १९७७ च्या सुरुवातीपर्यंत सतत चालू ठेवले. माझी योजना होती की मी मार्च पर्यंत शिबिरांमध्ये बसेन, आणि त्यानंतर आपल्या जीवनाला अजून कुठे नेण्यासाठी आपला मार्ग निवडेन. परंतु असे झाले नाही. जानेवारी पासून मला एका ब्रेकची खूप आवश्यकता वाटू लागली आणि मी सुट्टीवर जाण्याविषयी विचार करू लागलो. मी नेहमी ग्राहम गैम्बी यांचा आभारी राहीन ज्यांनी मला धम्मगिरी मध्ये थांबून सेवा देण्यासाठी प्रोत्साहित केले, आणि तो अनुभव माझ्यासाठी तितकाच लाभदायक होता जितका की शिबिरात बसणे.

त्या वेळी विपश्यना विश्व विद्यापीठा (वि.वि.वि.) मध्ये काम करण्याचा अनुभव आजच्यापेक्षा थोडा वेगळा होता. तेव्हा तिथे कोणी भारतीय नव्हते आणि ना ही रोजचे कामकाज सांभाळणारे कोणी कर्मचारी होते. संगठीत कार्यालयाची प्रक्रिया देखील खूप कमी होती. एका वेळी मी एकत्रितपणे- कार्यालय चालवणे, टेलिफोनवर उत्तरे देणे, साधकांसोबत व्यवहार करणे, मजूर आणि चौकीदारांवर लक्ष ठेवणे, थोडीफार रक्कम सांभाळणे, पत्रांची उत्तरे देणे, हिशोब ठेवणे— या सर्वांसाठी जबाबदार होतो. आणि हे सर्व समताभावाने हास्यपूर्वक करणे मोठे आव्हानात्मक होते, आणि माझ्या असफलतांनी मला तितकेच शिकवले जितके की माझ्या दुर्लभ सफलतांनी. मला लवकरच याची जाणीव झाली की मला धर्माविषयी खूप काही शिकायचे आहे, आणि मी वी.आई.ए. मध्ये आपल्या प्रवास वाढवण्याचा निर्णय घेतला, अनिश्चित काळासाठी.

उन्हाळा येताच धम्मगिरीतील पाण्याची समस्या अजूनच अधिक गंभीर झाली. आम्हाला नगरपालिकेच्या जोडलेल्या पाईपलाईन मध्ये कचरा अडकल्यासारखे वाटत होते, आणि ती साफ करायला खूप उशीर होत होता. श्री गोयंकाजींनी मला या विषयी इगतपुरी नगरपालिकेला एक पत्र लिहिण्यासाठी सांगितले. मी लिहिले की जर समस्येचे समाधान लवकर झाले नाही तर, नाईलाजाने आम्हाला केंद्र बंद करावे लागू शकते. पत्र पाठविण्याआधी मी श्री गोयंकाजींना अनुमोदनासाठी ते पत्र दाखवले. त्यांनी मला ते बदलण्याचा अनुदेश देत म्हटले, "आपले काम साधना केंद्र उघडणे आहे. त्याला बंद करणे मारा (धर्म विरोधी शक्तीं) चे काम आहे."

जून-७७ मान्सूनची सुरुवात घेऊन आला. शिबिरे बंद झाली आणि धम्मगिरीमध्ये काही थोडेफार निवडक लोकच राहिले. काही दिवसातच, सारी भूमी ताज्या हिरवळीने आच्छादली गेली आणि पहाडाच्या चारही बाजूंनी झरे वाहू लागले. त्या वेळी, हे ठिकाण मला धुक्यात लपेटलेले आणि जगापासून दूर, शांतीच्या एका द्वीपासमान प्रतीत होत होते. आमच्यापैकी जे थांबले होते, ते आळीपाळीने सेवा देत होते आणि स्वत: शिबिरात बसत होते. श्री गोयंकाजींच्या प्रोत्साहनाने आम्ही पालि भाषा शिकणे सुरु केले. शिबिरादरम्यान आम्ही ज्या गाथांना इतक्या वेळा ऐकले होते, शेवटी त्याच्या अर्थाला समजणे प्रेरणादायी होते. प्रत्येक सप्ताहाच्या शेवटी श्री गोयंकाजी धम्मगिरीला येत असत आणि आमच्या वर्गात उपस्थित होत असत. ते आमच्या प्रगतीने तितकेच प्रसन्न होत, जितके की आम्ही होतो. तासं-तास ते आम्हाला धर्म समजावित आणि म्यंमा (म्यानमार) तील आपल्या अनुभवांच्या गोष्टी सांगत.

धम्मगिरीचे ते सुरुवातीचे दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय आहेत. त्या वेळी इतकी बीजे पेरली गेली जी नंतरच्या वर्षांमध्ये फळे आणि हिरवळ देणारी होती.

जेव्हा मी प्रत्येक वर्षी वी.आई.ए. मध्ये येतो तेव्हा ही झाडेच त्या जागेच्या बदलाला खूप स्पष्ट रुपात व्यक्त करतात. मला १९७७ च्या मान्सून दरम्यानची एका सकाळची गोष्ट आठवते, जेव्हा कार्यालयाच्या बाहेर आम्रवृक्षाखाली एका छोट्याशा जागेत 'ओक' च्या शंभर बिया पेरल्या होत्या. आज ती बीजे ठिक-ठिकाणी प्रत्येकी वीस फुट लांब झाली आहेत आणि शांती पठारची सीमा बनले आहेत. मला आठवते जेव्हा गेट मधून जुन्या बंगल्यांपर्यंतच्या रस्त्यावरील झाडे जेमतेम माझ्या खांद्यांइतकीच वाढली होती.

मला आठवते जेव्हा मी पहिल्यांदा इथे आलो होतो, तो बर्मी बोधिवृक्ष (वडाचे झाड) पुरुषांच्या निवासा (डॉमेटरीज) च्या मध्ये असण्याऱ्या बगीचात इतका कमजोर होता की त्याला एका काठीचा सहारा द्यावा लागला होता. आज याचे खोड इतके जाड आणि सरळ झाले आहे, मुळे खोलवर गेलीत आणि याच्या फांद्या सुखद सावली देत आहेत– जणू धम्मगिरीच्या विकासाचे एक दृश्यमान प्रतीक आहे.

– बिल हार्ट, कैनडा

---------------

*जसे हे नव-स्थापित केंद्र सुचारू रूपाने काम करू लागले, पुढे त्याच्या विस्ताराविषयी विचार करणे संभव झाले. पहिली प्राथमिकता ध्यान सुविधांमध्ये सुधारणा करून शून्यागार प्रदान करणे ही होती जिथे साधक एकांतात ध्यान करू शकतील. त्या अनुसार १९७८ मध्ये शांती पठारावर पगोड्याचे निर्माण कार्य सुरु झाले. या परियोजनेमध्ये भाग घेण्यासाठी पश्चिमेतून बरेचसे साधक विशेष रूपाने धम्मगिरीला आले. भारतीयांसोबत ते ही सुतार, राजमिस्त्री, वीजमिस्त्री आणि सामान्य मजुरांच्या रुपात नेहमी कठीण परिस्थितीमध्ये काम करीत होते. त्यांच्या मदतीने मार्च १९७९मध्ये पगोड्याच्या पहिल्या चरणाचे उद्घाटन करणे शक्य झाले.*

## १९७८-१९७९मध्ये धम्मगिरी

ट्रेन हळू हळू होत पूर्ण थांबली. मला आणि मॉरीनला गर्दीतून आपले सामान घेऊन निघण्यासाठी बराच संघर्ष करावा लागला आणि धक्का-बुक्की करत, दमून-भागून आम्ही इगतपुरी स्टेशनच्या प्लेटफॉर्म वर उतरलो. रस्त्यात छोट्या-छोट्या मुलांच्या झुंडीने आमचे स्वागत केले. तोंडाने उसाची कांडे चावत ती ओरडत होती, "तुमचे नाव काय आहे?" आणि "मला एक रुपया द्या!" डोक्यावर काळ्या कावळ्यांचा थवा जोर-जोरात कांव-कांव करीत होता. दुपारच्या जेवणाच्या तयारीसाठी प्रत्येक घरात आणि गल्लीत कोळशाच्या चुलींच्या धुराने हवा भरली होती. जोरात वाजणारी ट्रेनची शिट्टी, चमकदार ढंगांनी सजवलेल्या ट्रकांच्या मोठ-मोठ्या आवाजाच्या हॉर्नशी मुकाबला करीत होती. वाहतुकीच्या गोंगाटासोबतच एका जुन्या लाउड-स्पीकरमधून लोकप्रिय भारतीय संगीताचा सतत येणारा आवाजही त्यात सामिल होता. ताज्या वाटलेल्या मसाल्यांचा गोड सुगंधही हवेत भरून राहिला होता.

माणसांनी, मुलांनी, गाई आणि बैलगाड्यांनी भरलेल्या गल्ल्यांमधून जात आम्ही धम्मगिरीचे जवळजवळ वीस मिनिटांचे अंतर पायी पूर्ण केले. एका कोरड्या, धूळ भरलेल्या रस्त्याने नगराला धम्मगिरी केंद्राशी जोडले होते.



पहिल्या पगोड्याच्या निर्माण कार्याला उशीर होत असलेला पाहून सर्व साधकांनी मिळून काम केले जेणकरुन याचे उद्घाटन वेळेवर होऊ शकेल.

भौतिक रूपाने धम्मगिरी कोणते अलिशान हॉटेल तर नव्हते, तरीही इथल्या सुविधा पायाभूत आणि पर्याप्त होत्या. इमारती मुख्य रूपाने दगडाच्या आणि कॉन्क्रीटच्या बनवलेल्या होत्या. गवताच्या जवळपास पंचवीस झोपड्यांनी तिथे साधना करण्यासाठी येणाऱ्या लोकांच्या वाढत्या संख्येला सामावून घेण्यासाठी खूप मदत केली. जमीन छोट्या छोट्या झाडांनी-रोपांनी भरली होती आणि एका बहरलेल्या बगीच्याप्रमाणे सुसज्जित केली गेली होती. विशेषकरून सूर्योदय आणि सूर्यास्ताची वेळ खूप सुंदर होती, जेव्हा की सूर्याचा कोमल प्रकाश आसपासच्या कोरड्या पहाडांना उजळवीत होता.

मॉरीन आणि मी थंडीच्या मोसमातल्या पहिल्या दस-दिवसीय शिबिरात (१९७८-१९७९) उत्सुकतेने सामिल झालो. मोठा हॉल पश्चिमी आणि सर्व वर्गांच्या भारतीयांच्या रोचक मिश्रणाने खचाखच भरला होता. शिबिरादरम्यान मी आपल्या दैनिक जीवनात साधना आणि तिच्या निहितार्थांच्या गंभीर अर्थाला एकत्र जोडण्याचा प्रयास केला. मला अजूनच अधिक स्पष्ट रूपाने समजू लागले की हे सर्व एकत्र कसे सम्मिलित होते, तसेच धर्माच्या व्यावहारिक आणि सैद्धांतिक पक्षाला आपल्या अनुभवाने जाणून पाहू शकलो. मी जे शिकत होतो त्यात मला साधेपणा आणि स्वच्छता दिसत होती. धम्मगिरीचे शक्तिशाली वातावरण अथक प्रयास करण्यासाठी खूप अनुकूल होते. अनेक वर्षांपासून अभ्यास करत असणाऱ्या निष्ठावान साधकांच्या उपस्थितीने आम्हाला अजूनच अधिक प्रेरणा देण्यामध्ये मदत केली.

पहिल्या दहा दिवसांच्या शेवटी, मॉरीनने आणि मी निर्णय घेतला की आम्ही अजून एक दहा दिवसांचे स्वयं-शिबिर करावे. वीस दिवसांनंतर आम्हाला विश्वास वाटला की आमची लांबवरची यात्रा

सार्थक झाली. आम्ही निश्चय केला की आता आम्ही धम्मगिरीमध्येच थांबणार आहोत.

इथे राहण्याचा अर्थ होता काम करणे, मग आपण साधनेमध्ये बसून काम करा अथवा केंद्राच्या कार्यांमध्ये मदत करा. मॉरीनला कार्यालयात काम करण्याची संधी मिळाली आणि मला पगोड्याच्या निर्माण कार्यात काम करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले. हे एक पारंपारिक बर्मी पगोड्याच्या आकारामध्ये कॉन्क्रीटने बनलेले मोठे, गोलाकार छत असलेले आणि आतमध्ये एकांतात व्यक्तिगत ध्यान करण्यासाठी गुहेसारखे ध्यान-कक्ष गोलाकार पंक्तिंमध्ये बनलेले असे आहे.

धम्मगिरीमध्ये राहिल्यामुळे आम्हाला गंभीरतेने ध्यान करण्यासाठी आणि धर्मामध्ये अजून अधिक प्रतिष्ठापित होण्यासाठी तसेच सेवा देण्यासाठी आदर्श वातावरण मिळाले. आळी-पाळीने ध्यान आणि सेवेच्या अवधीने एक उत्कृष्ट संतुलन बनून राहिले.

सहा महिन्यांनंतर, इगतपुरीच्या वर्दळीच्या नगरातून जाताना त्या धुळीच्या रस्त्याने चालत आम्ही पुन्हा रेल्वे स्टेशनला पोहोचलो. आम्हा दोघांनाही श्री गोयंकाजींबद्दल खोलवर आदर वाटू लागला, जे धर्माचा सिद्धांत तसेच व्यवहार या दोन्हीचे इतके प्रबळ उदाहरण होते.

– ब्रूस स्टुवर्ट, न्यूजीलैंड/यू.एस.ए.

-------------

सुरुवातीला साधकांना नेहमी शून्यागार वाटावे लागत होते, कारण पहिल्या चरणात पगोडा मध्ये केवळ बत्तीस शून्यागार होते. कधी कधी एका शून्यागारामध्ये सहा किंवा सात साधक एकत्र बसत होते.

प्रत्येक वर्षी अधिक शून्यागारांचे निर्माण कार्य केले गेले आणि आता पगोडा मध्ये २०० हून अधिक शून्यागार आहेत. १९८०मध्ये पगोड्याच्या बाजूला एक मोठा धम्महॉल बनवला गेला. धम्मगिरीच्या परिसराला हरित क्षेत्र बनविण्यासाठी व्यापक वृक्षारोपणही केले गेले आहे. या वर्षी एक मोठी पाण्याची टाकी बनवून तयार झाली आहे आणि जलाशय बनविण्यासाठी प्रयोगात्मक रीतीने एक बांध बनविला आहे. विपश्यना विशोधन विन्यास संस्थेच्या तत्वावधानामध्ये एका प्रिंटींग प्रेसचीही स्थापना केली गेली आहे आणि प्रत्येक वर्षी एक वर्षांच्या पालि कोर्सचे आयोजन केले जात आहे.

परंतु सर्वात महत्वपूर्ण विकास विटा आणि कॉन्क्रीट इत्यादींमध्ये नाही झाला तर साल दर साल धम्मगिरीमध्ये धर्माचे वातावरण मजबूत होत राहिले आहे. जशी साधकांना एकांतात राहण्याची आणि ध्यान करण्याची सुविधा वाढत गेली तसे श्री गोयंकाजींनी केंद्रामध्ये तीस दिवसांचे शिबिर संचालित करणे सुरु केले. १९८७च्या सुरुवातीला एका अधिक दीर्घ शिबिराची योजना बनवली आहे. जे लोक विद्यापीठात येतात, त्यांना अत्याधिक अनुकूल वातावरणात गंभीरतेने, गहन साधना करीत मुक्तीच्या मार्गावर पुढे जाण्याचा सुअवसर मिळत आहे. आज हे अनोखे केंद्र या गोष्टीचे अद्भुत उदाहरण आहे की परिश्रम आणि धर्माच्या बळावर काय नाही केले जाऊ शकत. विपश्यना साधना विश्वभरातील साधकांना अभ्यास करण्यासाठी परिपूर्ण समर्थन आणि प्रेरणा देत आहे.

-----------



भारतातील पहिल्या पगोड्याच्या उद्घाटन प्रसंगी पूज्य गुरुजींचे सार्वजनिक प्रवचन, ज्यामध्ये गावातील लोकही आमंत्रित होते.



पहिल्या पगोड्याला खाल पासून वरपर्यंत झाकत बनवल्या गेलेल्या विशाल पगोड्यामध्ये एकूण 322 शून्यागार आहेत आणि 200 नवीन शून्यागार वेगळे बनविले आहेत.

*निम्नलिखित अंश १९७९ मध्ये श्री गोयंकाजींद्वारे विपश्यनेच्या आचार्यांच्या रुपात त्यांनी दहा वर्ष पूर्ण केल्याप्रसंगी लिहिलेल्या एका लेखातून घेतले गेले आहेत:--*

.... मागच्या दहा वर्षात विपश्यनेच्या प्रसारासाठी जे काम गेले आहे, त्याचे मी अवमूल्यन करीत नाही, कारण असे करणे म्हणजे इतक्या लोकांनी दिलेल्या निस्वार्थ सेवेचे अवमूल्यन करणे होईल. परंतु सत्य हे आहे की आत्तापर्यंत या कार्यामध्ये केवळ पहिले आणि एक छोटेसे पाऊल उचलले गेले आहे. भारतात एक मजबूत आधार बनवून, विपश्यनेचा प्रकाश विश्वभरात पसरला पाहिजे.

हे जीवनभराचे काम आहे. ही पर्वताची उभी चढण आहे. मार्गात आतल्या आणि बाहेरच्या कित्येक अडचणी आणि रोधक गोष्टी आहेत. या अडचणींना दूर करण्यासाठी धर्माच्या महान शक्तीची, दृढतेची, सहनशीलतेची, उत्साहाची आणि अहंकारहीनतेची आवश्यकता आहे.

कित्येक वेळा जेव्हा मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, तेव्हा मी पाहतो की मी त्यांच्या वजनाखाली दबलो गेलो आहे. परंतु लगेचच मी आपल्या गुडघ्यांवरची धूळ झटकून उभा राहतो आणि धर्मबळासोबत पुन्हा चालणे सुरु करतो. यात्रेचा जो काही हिस्सा पूर्ण झाला आहे, तो चालत राहण्याची प्रेरणा आणि शक्ती देत राहतो तसेच कृतज्ञतेचा भाव मार्गामध्ये सर्वात मोठी सहायता करतो. तो

पुढच्या यात्रेसाठी उर्जा प्रदान करतो.

म्हणून माझ्या मनात कृतज्ञता उमटत राहते. सर्वात आधी त्या बुद्धांप्रति ज्यांनी या हरवलेल्या विद्येला शोधून काढले आणि ना केवळ आपल्या कल्याणासाठी तिचा उपयोग केला, तर लोक-कल्याणासाठी तिला मुक्त-हस्ताने आणि करूण-चित्ताने वितरीत केले. मी बुद्धांपासून सयाजी ऊ बा खिन पर्यंतच्या सर्व आचार्यांच्या शृंखलेचा आभारी आहे, ज्यांनी या अद्भुत विद्येला आपल्या शुद्ध रुपात सांभाळून ठेवले, ज्यामुळे मला ती शिकण्याचा अवसर मिळाला. मी आपल्या परिवारातील सर्व सदस्यांचा आभारी आहे ज्यांचा सहयोग धर्म-सेवेमध्ये इतका सहायक राहिला आहे. मी आपल्या सर्व धर्म-साथींचा आणि मित्रांचा आभारी आहे, ज्यांनी मला आपला सहयोग आणि सहायता दिली, ज्यांच्या साथीने मला धर्मपथावर चालण्याची उर्जा दिली आहे. जर या मागील दहा वर्षांच्या दरम्यान मी आपल्या शरीराने, वाणीने अथवा मनाच्या कर्मांनी जाणते-अजाणतेपणे, कोणाप्रतीही काही चुकीचे केले असेल, तर मी क्षमाप्रार्थी आहे.

**सर्वांचे मंगल होवो ! सर्वांचे कल्याण होवो ! सर्वांची स्वस्थ मुक्ती होवो !**

कल्याण मित्र,
सत्यनारायण गोयंका.

| **अतिरिक्त उत्तरदायित्व** | 7. श्री मुकुंद शेकतकर, अहमदनगर (महाराष्ट्र) |
|---|---|
| 1. श्री प्रेमनारायण शर्मा (व.स.आ.) धम्मनाग केंद्र आचार्यांच्या रुपाने सेवा | 8. Mr. Wilson Chen, Taiwan. |
| | 9. Miss Nittaya Namsatean, Thailand |
| **नव नियुक्ती** | **बालशिविर शिक्षक** |
| **सहायक अचार्य** | 1. श्रीमती जयश्री निशांत भोयर, भंडारा |
| 1. श्री प्रह्लाद तरिगोप्पुला, हैदराबाद | 2. श्रीमती भाग्यश्री डोंगरे, भंडारा |
| 2. श्री लिंगैयाह चेरुपल्ली, नालगोंडा (तेलंगाना) | 3. श्री अविनाश साखरे भंडारा |
| 3. श्री नारायण भराडे, औरंगाबाद | 4. सुश्री संगीता मेश्राम नागपूर |
| 4. श्रीमती सुरेखा शिलेवंत, डोंबीवली (पूर्व) मुंबई | 5. श्री प्रशांत मेश्राम, नागपूर |
| | 6. श्री हर्षल दोशी, मुंबई |
| 5-6. श्री बृज मोहन एवं श्रीमती सरिता वर्मा. करनाल, (हरियाणा) | 7. श्री प्रीतम नागराले, मुंबई |
| | 8. Dr. Kata Kerenyi, Hungary, Urop |

## मंगल मृत्यू

१. भूज-कच्छ निवासिनी श्रीमती कमलाबेन, श्री जयंतीलाल ठक्कर यांच्या बरोबर खांद्याला खांदा लावून धर्मकार्यात सदैव सहयोगिनी बनून राहिल्या. अनेक शिबिरांचे संचालन करण्याबरोबरच हे दोघे 'धम्मअम्बिका' विपश्यना केंद्र (द. गुजरात) चे केंद्रीय आचार्य झाले आणि या क्षेत्राचे क्षेत्रीय आचार्य देखील. श्री जयंतीलाल यांनी लिहिले आहे, "शुद्ध धर्माने मला आपल्या चर्म-चक्षुंनी २२ मे, २०२२ ला त्यांना शांतिपूर्वक या संसाराला सोडत असताना पाहण्याचा अवसर प्रदान केला आहे. आपण सर्व त्यांना धर्मपथावर प्रगतीसाठी मंगल मैत्री देऊया."

२. कैनडा निवासी श्री नारायणदास सापरियांनी १६ मे, २०२२ ला ९२ वर्षांच्या पक्व वयात शांतिपूर्वक शरीर त्याग केला. जीवनाच्या अंतिम क्षणांपर्यंत त्यांची धर्म प्रसारणाची प्रबळ इच्छा खूप प्रेरणाजनक राहिली आणि लंडन मध्ये विपश्यना केंद्र स्थापन करण्यात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली. ते धर्मपथावर उत्तरोत्तर पुढे जात राहोत.

३. नवसारीचे वरिष्ठ सहायक आचार्य तसेच वास्तुकलेचे मर्मज्ञ श्री ठाकोरभाई यांनी १५ मे २०२२ला शांतिपूर्वक शरीर त्याग केला. त्यांनी अनेक शिबिरांचे संचालन करण्याबरोबरच अनेक केंद्रांसाठी नकाशे इत्यादी बनवून त्यांच्या निर्माण कार्यात खूप सहयोग दिला. त्यांच्या पुण्यकार्यांच्या फलस्वरूपाने धर्मपथावर त्यांची सतत प्रगती होत राहो, धर्म परिवाराची हीच मंगल कामना आहे.

४. विपश्यनाचार्य श्री निरिंद छायोडम (८४) यांचे रविवार, ५ जून, २०२२ ला बैंकॉकच्या एका हॉस्पीटलमध्ये निधन झाले. श्री निरिंद छायोडम यांना १९९५मध्ये स.आ. आणि १९९८मध्ये आचार्य नियुक्त केले गेले होते. त्यांनी ३० हून अधिक वर्षांपर्यंत थायलंडच्या धर्म कार्यात श्री गोयंकाजींची मदत करण्यात प्रमुख भूमिका निभावली. श्री गोयंकाजींनी त्यांना थाई भाषेमधील सर्व निर्देशांना आणि प्रवचनांना रेकॉर्ड करण्यासाठी निवडले होते.

आपली पत्नी, आचार्या सुत्थी आणि अन्य जुन्या साधकांबरोबर त्यांनी थायलंडमध्ये अधिकृत धर्म ट्रस्ट स्थापने सहित जमीन शोधणे आणि थायलंडमध्ये पहिले विपश्यना केंद्र बनविण्यामध्ये प्रमुख भूमिका निभावली. शिल्पी श्री निरिंद यांनी कित्येक अन्य केंद्रांची रचना आणि निर्माण कार्यांचे समन्वय केले. ते एक करुणामय आणि उत्साही व्यक्ती होते ज्यांनी नेहमी धर्म सेवकांच्या देखभालीकडे विशेष लक्ष दिले. आपल्या शेवटच्या वर्षांमध्ये कमजोर स्वास्थ्यामुळे त्यांना धर्मक्षेत्राच्या कामकाजामध्ये सक्रिय भूमिकेतून नाईलाजाने बाजूला व्हावे लागले. धर्मपथावर त्यांच्या उत्तरोत्तर प्रगतीची मंगल कामना.

----------

## मुंबई मध्ये विपश्यनेचा नवा परिसर

'धम्मपत्तन विपश्यना केंद्र' च्या अंतर्गत मुंबईच्या गोरेगाव (पूर्व) मध्ये शिबिर लावण्यायोग्य एक नवे स्थान (परिसर) उपलब्ध झाले आहे जिथे सप्टेंबर २०२१ पासून विपश्यनेचे काम सुरु झाले आहे. ही एक ५ मजली इमारत आहे आणि याचे क्षेत्रफळ ११,००० स्क्वेअर फुट आहे. याला धम्मपत्तन विपस्सना ट्रस्ट च्या अंतर्गत- 'गोरेगाव विपश्यना केंद्र' म्हटले आहे.

सुविधांमध्ये ५व्या मजल्यावर एक वातानुकुलीत धम्महॉल, तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर निवासासाठी पडद्यांमध्ये विभागलेले मोठे-मोठे कक्ष (डॉरमेट्रीज) आहेत, तसेच प्रत्येक मजल्यावर कॉमन पण पर्याप्त संख्येमध्ये शौचालय तसेच स्नानगृहांची सुविधा उपलब्ध आहे.

हे ठिकाण पश्चिमोत्तर मुंबईच्या साधकांसाठी खूप उपयुक्त आहे. लोक इथे दैनिक किंवा साप्ताहिक सामुहिक साधनेमध्ये सहजतेने भाग घेऊ शकतील आणि एक-दिवसीय तसेच ३-दिवसीय शिबिरांचा लाभ घेऊ शकतील. इथे पहिले १० दिवसांचे शिबीर २८ एप्रिल ते ९ मे २०२२पर्यंत सफलतापूर्वक संपन्न झाले. इथे होणाऱ्या वर्षभरातील शिबिर-कार्यक्रमांची सूची खाली दिली आहे.

या परिसराच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी काही अजून निर्माण कार्यांची योजना आहे. यामध्ये तळ मजल्यावर एक स्वतंत्र स्वयंपाकघर, शिबिर-कार्यालय, शौचालय या सोबतच काही वेग-वेगळ्या रूम्स तसेच खालच्या मजल्यावर २४ तास खुला राहणारा एक ध्यान-कक्ष, पुरुष तसेच महिलांसाठी वेगवेगळ्या (अतिरीक्त) लिफ्ट आणि जिने ही सामिल आहेत.

या योजनेसाठी दान खाली दिलेल्या नाव आणि खात्यामध्ये पाठवू शकता, ज्याचे विवरण ईमेल—info.gvc@vridhamma.org ला अवश्य पाठवावे जेणेकरून रिसीट पाठवता येऊ शकेल.

**'Dhamma Pattana Vipassana Trust',**
A/C. Goregaon Centre,
Axis Bank Ltd., Malad (west) branch,
A/C No. 921010040391149,
IFSC UTIB0000062, Mumbai.

धम्मपत्तनान्तर्गत 'गोरेगाव विपश्यना केंद्र' च्या अधिक माहिती आणि बुकींगसाठी कृपया ही लिंक वापरावी—gvc.vridhamma.org अथवा व्हाटसअप नं.+91 84549 27150 वर मेसेज पाठवावा.

## धम्मपत्तनान्तर्गत 'गोरेगाव विपश्यना केंद्र' चे भावी कार्यक्रम

**तीन दिवसीय—केवळ पुरुष:** 30-6 ते 3-7-22, 4 ते 7-8, 17 ते 20-11, **केवळ महिला:** 8 ते 11-9, 13 ते 16-10. **दस दिवसीय— केवळ पुरुष:** 13 ते 24-7-22, 21-9 ते 2-10, 30-11 ते 11-12-22. **केवळ महिला:** 17 ते 28-10, 26-10 ते 6-11, 21-12 ते 1-1-2023.

--------

## बुद्ध-पौर्णिमेनिमित्त एक दिवसीय शिबिरांचे सफल आयोजन

१. 'ग्लोबल विपश्यना पगोडा' मध्ये दीर्घ प्रतिबंधांनंतर १५ मे, २०२२ ला बुद्ध पौर्णिमेनिमित्त एक-दिवसीय महाशिबिराचे आयोजन सफलतापूर्वक संपन्न झाले ज्यामध्ये सुमारे ३००० साधकांनी भाग घेतला. शिबिरातील शेवटचे सार्वजनिक प्रवचन ऐकण्यासाठी सुमारे ३०० लोक आले होते.

२. अशाच प्रकारे पटनाचे विपश्यना केंद्र- 'धम्मपाटलिपुत्त' मध्येही एक दिवसीय शिबिरामध्ये सुमारे १५० लोकांनी भाग घेतला. या प्रसंगी प्रदेशाचे मुख्यमंत्री श्री नितीशकुमार यांनी आपल्या काही मंत्र्यांसोबत येऊन धम्मकक्षात आनापान साधनेचा अभ्यास केला. त्यांनी लोकांना संबोधित केले की जास्तीत जास्त लोकांनी विपश्यना शिबिरात भाग घेऊन या सुविधेचा लाभ घ्यावा. सरकारी कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना सवैतनिक रजेची सुविधा आधीपासूनच दिलेली आहे. त्यांचे अशा प्रकारचे आगमन लोकांना खूप सुखद वाटले.

३. असेच अन्य अनेक ठिकाणांहून एक दिवसीय शिबिरांचे समाचार मिळाले आहेत तसेच अनेक ठिकाणी ऑनलाइन शिबिरांचे आणि सामुहिक साधनांचे आयोजन करण्यात आले. धर्म खूप जोमाने पसरू दे, सर्वांचे मंगल होऊ दे!

---------

## अति महत्वपूर्ण सूचना

1. सेंट्रल आईवीआर (इंटरैक्टिव्ह वॉयस रिस्पॉन्स) संभाषण नंबर- ०२२-५०५०५०५१ अर्जदार या नंबरवर आपल्या नोंदवलेल्या मोबाईल नंबर (फॉर्म मधील उल्लेखित नंबर) ने आपली शिबिर नोंदणीची स्थिति तपासण्यासाठी, रद्द करण्यासाठी, स्थानांतरीत करण्यासाठी अथवा कुठल्याही सेंटरवर नोंदणी केलेल्या आपल्या अर्जाची पुष्टी करण्यासाठी कॉल करू शकतात. ते या सिस्टीमद्वारे केंद्राशी सुद्धा संपर्क करू शकतात. हा भारताच्या सगळ्या विपश्यना केंद्रांसाठी एक केंद्रीय संपर्क नंबर आहे.

2. जर अकेंद्रीय (नॉन-सेंटर) भावी शिबिरांचे कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशन करण्यासाठी पाठवू इच्छिता, तर कृपया त्यांनी आपल्या समन्वयक क्षेत्रिय आचार्य (सीएटी) यांच्या सहमती पत्राबरोबर पाठवावे, जेव्हा की स्थापित केंद्राचे कार्यक्रम केंद्रीय आचार्य (सीटी) यांच्या सहमती पत्राबरोबर आले पाहिजेत. याशिवाय आम्ही कोणतेही कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशित करू शकत नाही.

## ऑनलाइन भावी शिबिर कार्यक्रम व आवेदन

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर उपलब्ध आहे. कोविड- १९ च्या नव्या नियमानुसार सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. फॉर्म किंवा एप्लीकेशन आता स्वीकारले जात नाही. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करा.

*https://www.dhamma.org/en/schedules/schgiri*

**कृपया अन्य केंद्रांच्या कार्यक्रमानुसार सुद्धा याच प्रकारे आवेदन करा. अन्य केंद्रांच्या कार्यक्रमांचे विवरण कृपया खालील लिंक वर पहा-**

*https://www.dhamma.org/en-US/locations/directory#IN*

**हिंदी वेबसाइट हेतु लिंकः www.hindi.dhamma.org**

## विपश्यना पत्रिकेसंबंधी आवश्यक सूचना

येणाऱ्या जुलै महिन्यामध्ये पत्रिकेचे ५२ वे वर्ष सुरु होत आहे. मागील जवळपास दोन वर्षांपासून पत्रिकेचे प्रकाशन केवळ ऑनलाईनच चालू होते. आता जुलै महिन्यापासून पत्रिका छापणे पुन्हा सुरु होत आहे. परंतु पेपर इत्यादी सर्व गोष्टींचे खर्च इतके वाढले आहेत की दुपटीहून अधिक खर्च येत आहे. त्यामुळे खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

१. पत्रिका आता आठ पृष्ठांची न होता, मुख्य लेख आणि विभिन्न सूचनांसहित केवळ चार पृष्ठांमध्ये छापली जाईल. प्रत्येक तिसऱ्या महिन्यात (त्रैमासिक) मुख्य लेखा सोबत कार्यक्रम इत्यादी आठ पृष्ठांमध्ये छापले जातील.

२. अशा प्रकारे वर्षातून दोन वेळा भावी शिबिर कार्यक्रम छापले जातील आणि राहिलेल्या दोन अंकांमध्ये सामूहिक साधना, एक दिवसीय शिबिरे तसेच प्रकाशना-संबंधी अन्य सूचना छापल्या जातील.

३. कृपया साधकांनी या पत्रिका आपल्याकडे सांभाळून ठेवाव्यात जेणेकरून वर्षभर त्या कामी येतील आणि दुसऱ्यांदा कोणाला विचारण्याची आवश्यकता भासणार नाही. अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या 'ऑनलाईन भावी शिबिर कार्यक्रम एवं आवेदन' ची लिंक पहावी.

४. पत्रिकेचे वार्षिक शुल्क रु. ३०/- वरून वाढवून रु. १००/- केले जात आहे. नवीन आजीवन सदस्य घेतले जाणार नाही. पण पहिल्यापासून जे आजीवन सदस्य आहेत त्यांची पत्रिका चालू राहील.

५. ऑनलाईन सर्व अंक पूर्ववत उपलब्ध होतील. (वरील क्रमानुसारच)

६. ऑनलाईन शिबिरांचे बुकींग चालूच राहील. त्याकरीता पत्रिकेच्या प्रत्येक अंकात सूचना छापल्या जात आहेत. कृपया लक्षपूर्वक वाचून त्यांचा उपयोग करावा.

## विपश्यना विशोधन विन्यास

विपश्यना विशोधन विन्यास( Vipassana Research Institute- VRI) एक अशी संस्था आहे जी साधकांसाठी धर्मासंबंधी प्रेरणादायक पाठ्य सामग्री योग्य किमतीत उपलब्ध करते. येथील सगळे साहित्य कमीत कमी किमतीत उपलब्ध आहे ज्यामुळे अधिकाधिक साधक याचा व्यावहारिक लाभ घेऊ शकतील. विपश्यना साधनेसंबंधी अमूल्य साहित्याचा हिंदी, इंग्रजी तसेच अन्य भाषांमध्ये अनुवाद तसेच संशोधन करावयाचे आहे. यासाठी विद्वानांची आवश्यकता आहे. शोधकार्य मुंबईतील या ठिकाणी होईल– **'विपश्यना विशोधन विन्यास'**, परियत्ति भवन, विश्व विपश्यना पगोडा परिसर, एस्सेल वर्ल्ड जवळ, गोराई गाव, बोरीवली पश्चिम, मुंबई- 400 091, महाराष्ट्र, भारत. फोनः कार्या. +9122 50427560,

मो. (Whats App) +91 9619234126.

या शिवाय VRI हिंदी, इंग्रजी व मराठी मासिक पत्रिकांच्या माध्यमातून पूज्य गुरुजी द्वारा झालेले पत्र व्यवहार, जुने ज्ञानवर्धक लेख, दोहे, मुलाखती, प्रश्नोत्तर इत्यादीं प्रेरणाजनक माहिती प्रकाशित करते, ज्याने साधकांची धर्म पथावर उत्तरोत्तर प्रगती होत रहावी.

या सर्व कार्याला सुरू ठेवण्यासाठी साधकांचा सहयोग अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात अनेक साधकांच्या लाभासाठी धर्माच्या वाणीचे प्रकाशन अनवरत चालू रहावे, यासाठी सहयोग देण्यास इच्छुक असणाऱ्या साधकांनी खालील पत्त्यावर संपर्क करावा. या संस्थेला दान देणाऱ्यांसाठी सरकारची आयकर अधिनियम 1961 ची धारा 35-(1) (iii) च्या नियमानुसार शंभर टक्के आयकर सूट प्राप्त आहे. साधक याचा लाभ घेऊ शकतात. यासाठी बँकेची माहिती याप्रकारे आहे—

**विपश्यना विशोधन विन्यास,** ऍक्सिस बैंक लि., मालाड (प.)—


खाता क्र. 911010004132846; IFSC Code: UTIB0000062

**संपर्क-** 1. श्री डेरिक पेगाडो - 022-50427512/ 28451204

2. श्री बिपिन मेहता - 022-50427510/ 9920052156

3. ईमेल - audits@globalpagoda.org

4. वेबसाइट- https://www.vridhamma.org/donate-online







**फोटो: घड्याळ्याच्या क्रमानुसार:**

१. शांतिपठारावर मध्यभागी नवनिर्मित धम्मकक्ष, त्याच्या डावीकडे आचार्य-निवास तसेच उजवीकडे पगोडा दिसत आहे. एकदम समोर नवीन धम्मकक्षा (नं.2) चा पाया खोदला आहे आणि त्याच्या आजू-बाजूला खूप सारे छोटे-छोटे खड्डे झाडे लावण्यासाठी गुरुजींनी खोदून घेतले होते (१९८४).

२. उजवीकडे खाली पर्वतांच्या कुशीत मण्या (रत्ना) प्रमाणे चमकत असलेली धम्मगिरी (१९८५).

३. साधकांसाठी नव-निर्मित शौचालय-युक्त स्वतंत्र निवास-स्थान १९८६).

## विपश्यना पगोडा परिचालनार्थ "सेंचुरीज कॉर्पस फंड"

**'ग्लोबल विपश्यना पगोडा'**चा दैनंदिन खर्च सांभाळण्यासाठी पूज्य गुरुजींच्या निर्देशानुसार एका **'सेंचुरीज कॉर्पस फंडा'**ची व्यवस्था केली गेली आहे. त्यांची ही महत्वाची इच्छा पूर्ण करण्यासाठी **'ग्लोबल विपश्यना फाउंडेशन'** (GVF) ने हिशोब केला की जर 1,39,000 जणांनी, प्रत्येकाने रु. 9000/- जमा केले, तर १२५ कोटी रुपये जमतील आणि त्याच्या मासिक व्याजातून हा खर्च होऊ लागेल. जर कोणी एकदम एकल जमा करू शकत नसेल तर थोडी-थोडी सुद्धा जमा करू शकेल. *(काहींनी पैसे जमा केले आहेत आणि विश्वास आहे की लवकरच हे कार्य पूर्ण होईल.)*

साधक तसेच असाधक सर्व दात्यांना हजारो वर्षांपर्यंत आपली धर्मदानाची पारमी वाढविण्याची ही एक सुसंधी आहे. अधिक माहितीसाठी तसेच निधी पाठविण्यासाठी—

**संपर्कः**– 1. Mr. Derik Pegado, 9921227057. or
2. Sri Bipin Mehta, Mo. 9920052156,
A/c. Office: 022-50427512 / 50427510;
Email– audits@globalpagoda.org;

**Bank Details:**
'Global Vipassana Foundation' (GVF),
Axis Bank Ltd., Sonimur Apartments,
Timber Estate, Malad (W), Mumbai - 400064,
Branch- Malad (W).
Bank A/c No.- 911010032397802;
IFSC No.- UTIB0000062;
Swift code: AXIS-INBB062.
Online Donation- https://www.globalpagoda.org/donate-online

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबई मध्ये

### एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः

(१) **रविवार** – 17 जुलै, आषाढ पौर्णिमा (धम्मचक्कपवत्तन दिवस) तसेच

(२) **रविवार** – 9 ऑक्टोंबर शरद पौर्णिमा तसेच पूज्य गुरुजींच्या पुण्यतिथी निमित्ताने महाशिबिरांचे आयोजन निर्धारित केले आहे.

### एक दिवसीय शिबिर प्रतिदिन

या व्यतिरिक्त विपश्यना साधकांसाठी पगोडामध्ये दररोज एक दिवसीय शिबिरे आयोजित केली जात आहेत.

कृपया सामील होण्यासाठी लिंक चे अनुसरण करावे आणि एका मोठ्या समूहामध्ये ध्यान करण्याच्या अपार सुखाचा लाभ घ्यावा–**समग्गानं तपो सुखो! संपर्क** : 022-50427500 (Board Lines)- Extn. no. 9, मो. +91 **82918 94644. (सकाळी 11 ते संध्याकाळी 5 वाजे पर्यंत).** (दररोज 11 ते 5 वाजेपर्यंत)

Online registration: http://oneday.globalpagoda.org/register Email: oneday@globalpagoda.org

सूचना: कृपया पाणी पिण्याची बाटली आपल्याबरोबर आणावी आणि पगोडा परिसरात पाणी भरून आपल्यासोबत ठेवावी.

एक दिवसीय महाशिबिराला येण्यासाठी रात्रीच्या मुक्कामाकरीता धम्मालयामध्ये विश्रामाची सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहिती आणि बुकिंग साठी संपर्क: 02250427599 or email- info.dhmmalaya@globalpagoda.org

इतर कोणत्याही प्रकारच्या माहितीसाठी संपर्क:
info@globalpagoda.org or pr@globalpagoda.org

## दोहे धर्माचे

धम्मागिरीहून धर्माची, गंग प्रवाहित होय।
रोग, शोक सर्वांचे मिटे, मुक्ती दुःखातून होय॥

तपोभूमीहून धर्माची, गंग प्रवाहित होय।
जन-जनाचे होवे भले, जन जन मंगल होय॥

सुख जागे संसारात, दुःखी राही न कोय।
सर्वांच्या मनी रे धर्म, सर्वांचे मंगल होय॥

सुख जागे या जगतात, दुःखी राही न कोय।
जन जन मन मैत्री जागो, जन जन मंगल होय॥

## दोहे धर्माचे

धरतीवर पुनः धर्माची, मंगल वर्षा च होय।
शाप ताप धुतले जाओ, जन जन सुखी च होय॥

द्रोह सोड, मैत्री च कर, क्रोध सोड, प्रेम कर।
जागे जर धर्म जीवनी, सुधरती व्यवहार॥

परतची जागे जगतात, विपश्यनेची ज्योत।
सर्वांचे मंगल साधे, ना निवडता च गोत॥

परतच जागे धर्माची, वाणी मंगल मूळ।
जन जनाचे सुख साधे, मिटे च दुःख, भव शुळ॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनीः (02553) 244086, 244076.
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, जी-259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2566, ज्येष्ठ पौर्णिमा, 14 जून, 2022

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारतातून बाहेर पाठविण्यासाठी). "विपश्यना" **MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/286/2021-2023**

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**

**DATE OF PRINTING: (on-line-edition), DATE OF PUBLICATION: 14 June 2022**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरी, इगतपुरी - 422 403**
**जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत**
**फोन : (02553) 244076, 244086,**
**244144, 244440.**
Email: vri_admin@vridhamma.org;
course booking: info.giri@vridhamma.org
Website: https://www.vridhamma.org